महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महापारेषण समाचार

वर्ष-१० अंक-१

डिसेंबर-जानेवारी २०१५-१६

प्रिय कर्मचारी बंधु आणि भगींनीनो, नवीन वर्षाच्या सर्वांना मनपुर्वक शुभेच्छा,

चालू वित्तीय वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत आपण आता आहोत. ह्या वर्षाच्या कामगिरीचे ध्येय गाठण्याकरीता आणखी दोन महीने आपल्या हातात आहेत. मला आशा आहे की सर्व मुख्य अभियंता व विभाग प्रमुख आपल्या विभागाकरीता दिलेली कामगिरीचे लक्ष गाठण्याकरीता क्रियाशील असतील व सुनिश्चित करतील की ते ठरलेल्या कालावधीत पूर्णत्वाला नेतील.

हे दोन महीने पुढील वित्तीय वर्ष २०१६-२०१७ च्या नियोजना करिताही अत्यंत महत्वपूर्ण ठरतात. नियोजनाची संपूर्ण प्रक्रीया ह्या दोन महिन्यात पार पाडणे महत्वाचे असते. जेणेकरून, लागलीच एप्रिल महिन्यापासून नियोजनानुसार कृती करणे शक्य होते. अन्यथा नववर्षात नियोजन करून त्याची कृती विलंबाने सुरू होते व त्याचा दुष्परिणाम कृतीवर होवू शकतो.

व्यवस्थापनामध्ये नियोजन, आढावा व कृती अत्यंत महत्वाचे घटक ठरतात. ह्या तिन्ही बाबी जर आपण काटेकोर पध्दतीने करत असू तर आपल्याला आपले ध्येय व उद्दीष्टे गाठण्यास सकारात्मक वातावरण निर्माण होते. हे तिन्ही घटक संघटनेमध्ये निर्णय प्राप्त अधिकारी पातळीवर होणे महत्वाचे असते. कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता हे निर्णय प्राप्त अधिकाऱ्यांची महत्वाची तुकडी ठरते. त्याच्या पातळीवर सततच्या व नियमांत कामगिरीचा पाठपुरावा होणे संपूर्ण संघटनेकरीता महत्वाचे असते.

व्यवस्थापक व उत्कृष्ट व्यवस्थापक यामध्ये खुप अंतर असते. आपल्या सर्वांना उत्कृष्ट व्यवस्थापक होणे गरजेचे आहे, तरच एक उत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा आपण ठेवू शकतो. आपल्या कामाचे उत्कृष्ट व्यवस्थापन करण्याकरीता आपल्याकडे नियोजन, आढावा व कृती ह्यावर लक्ष केंद्रीत करणारे अधिकारी पाहीजेत. एक चांगला कार्यगट आपल्याला बनवणे त्या करीता गरजेचे ठरते. त्यांना प्रोत्साहन देणे, संसाधन देणे तसेच ते कुठे मागे आहेत व पुढे आहेत त्याचे विश्लेषण करून देणे हे त्यांच्या प्रमुखाची जबाबदारी ठरते. कार्यागटामध्ये कमजोर कडी असल्यास त्याचे सबळीकरण करण्यात येणे गरजेचे ठरते की, जेणेकरुन त्याचा परिणाम कार्यगटाच्या एकूण कामगिरीवर पडणार नाही.

पावसाळा सुरू होणे पुर्वी प्रकल्प, बांधणी व स्थापत्य या विभागाची कामगिरी पुढच्या पातळीवर जाणे महत्वाचे असते. पावसाळ्यात ह्या विभागांची कामे करण्यात अनेक अडचणी येत असतात. त्याकरीता आखून दिलेल्या टप्प्यात ही कामे पार पडली नाहीत तर संपूर्ण प्रकल्प रखडला जावू शकतो. करीता सततचा पाठपुरावा करून आपली कामे मार्गी लावणे विभाग प्रमुखांची जबाबदारी ठरते.

प्रकल्प लांबणीवर गेल्यास त्याचा दूरगामी परिणाम संघटनेच्या कार्यकुशलतेवर पडत असतो. वेळ व अर्थ अधिकचे लावावे लागतेच पण त्यामुळे प्रणालीचा पूर्णतम वापर होण्यास बाधा निर्माण होतात. त्याकरीता उपकेंद्र व वाहिनी यांचे कामे ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार होणे गरजेचे ठरते. संचालन व सुव्यवस्थेमध्येही वेळापत्रकानुसार सुव्यवस्थेची कामे पार पाडणे महत्वाचे असते. नाहीतर प्रणालीची संवेदनशीलता वाढू शकते. पारेषण प्रणाली मजबूत, भक्कम व अविरत ठेवणे आपल्या सर्वांची जबाबदारी आहे व त्यामध्ये कोणतीही कमी आपण ठेवणार नाहीत याचा मला विश्वास आहे.

चालू वित्तीय वर्षाचे निकाल आपल्या सर्वांच्या कामगिरीमुळे चांगले राहतील याबद्दल मला



राजीव कुमार मित्तल
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

शंका नाही मात्र आपण तेवढ्यावरच समाधानी राहून चालणार नाही. कायम तत्पर राहून कोणती आकस्मीक विपत्ती येणार नाही याची काळजी घेणे तितकेच गरजेचे आहे. सर्वांना बरोबर घेवून, सर्वांचे उचित योगदान घेवून आपल्याला प्रवास करायचा आहे. संघटनेला मजबूत व भक्कम करायची असेल तर आपण सर्व सक्षम मजबूत व भक्कम होणे गरजेचे आहे. आपण सर्व एकसंघ आहोत व आपल्याला संघटनेला पुढे घेवून जायचे आहे ह्या धारणेने सर्वांना संधी प्राप्त करून देवून आपल्याला संघटनेचे ध्येय, उद्दीष्ट गाठायचे आहे.

एक पारदर्शक, कुशल, तत्पर व आदर्श संघटनेस पुढच्या पातळीवर घेवून जाण्यास आपण सर्व सहकार्य कराल, याची मला खात्री आहे.

शुभेच्छा सह!

**राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

# अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची पुणे परिमंडळास भेट




दिनांक १५.०१.२०१६ रोजी अउदा बांधकाम नि संवसु परिमंडळ, पुणे येथे पुणे परिमंडळातील चालू प्रकल्प, संचलन व सुव्यवस्थेची सुरू असलेली कामे व प्रलंबित विषय, याबाबतची आढावा बैठक मा. श्री. राजीव कुमार मित्तल, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

यावेळी मुख्य कार्यालय, मुंबई येथील श्री. आर डी चव्हाण, संचालक (प्रकल्प), श्री. जे डी विके, मुख्य अभियंता(पारेषण –संवसु), श्री. एस एन भोपळे, अधीक्षक अभियंता (अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे तांत्रीक सहाय्यक) हे उपस्थित होते.

संबंधित बैठक ही पुणे परिमंडळांतर्गत चालू प्रकल्प, संचलन व सुव्यवस्थेची सुरू असलेली कामे व प्रलंबित विषय, याबाबतचा आढावा घेण्यासाठी आयोजीत करण्यात आली होती. बैठकी दरम्यान मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी वरील विषयांचा आढावा घेऊन परिमंडळातील अधिकारी व कर्मचारी यांच्याशी उपरोक्त विषयांवर चर्चा करून त्यांना आवश्वक त्या सुचना दिल्या. सदर बैठकी दरम्यान अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी परिमंडळातील अधिकारी व कर्मचारी यांना मोलाचे मार्गदर्शन करतांनाच परिमंडळातील कामाचे सातत्य पाहता परिमंडळ संचलना बाबत समाधान व्यक्त केले. याबरोबरच नवीन वर्षाच्या सर्वांना शुभेच्छा देवून त्यांना सोपविलेल्या जबाबदारी पार पाडतांनाचा आलेख सदैव उंचावत ठेवण्याबाबत आश्वस्त केले.

कार्यक्रम प्रसंगी पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता, श्री. रोहिदास मस्के, अधीक्षक अभियंता, श्री. अनिल कोलप, श्री. संजीव भोळे, श्री. संजय कुलकर्णी, श्री. रंगनाथ चव्हाण, श्री. मोतीसिंग चौहाण, सहा. महाव्यवस्थापक (मा.सं.), श्री. प्रशांत चौधरी, सहा. महाव्यवस्थापक (विवले), श्री. विजय नलावडे व पुणे



परिमंडळातील सर्व कार्यकारी अभियंते उपस्थित होते.

# अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची औरंगाबाद परिमंडळास भेट





दिनांक ०८.०१.२०१६ रोजी अउदा बांधकाम नि संवसु परिमंडळ, औरंगाबाद येथे औरंगाबाद परिमंडळातील चालू प्रकल्प, संचलन व सुव्यवस्थेची सुरू असलेली कामे व प्रलंबित विषय, याबाबतची आढावा बैठक मा. श्री. राजीव कुमार मित्तल, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

यावेळी मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी प्रशिक्षण केंद्र व देशातील एकमेव राज्य पारेषण प्रणाली निर्मीत ७६५ केव्ही दाब उपकेंद्रास भेट देवून कामाची पाहणी केली.

यावेळी मुख्य श्री. जे डी विके, मुख्य अभियंता(पारेषण –संवसु), श्री. गणपत मुंडे, मुख्य अभियंता, औरंगाबाद परिमंडळ, श्री. संतोष आंबेरकर, मुख्य महाव्यवस्थापक (विवले), अधीक्षक अभियंता, श्री. शशांक जेवळीकर, अरूण वाघमारे, नासीर कादरी, गोविंद जाधव व संबंधीत कार्यकारी अभियंते उपस्थित होते.

## महापारेषण अकोला येथे चाचणी विभागाचे लोकार्पण

दि. 01.01.2016 रोजी नविन वर्षाच्या शुभारंभाला अकोला येथे 132 केव्ही उपकेन्द्र गोरक्षण रोड या परिसरात महापारेषण कंपनीच्या अमरावती अउदा बांधकाम नि सं व सु परिमंडळा अंतर्गत अकोला चाचणी विभागाचे उद्घाटन अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता मा. सुरेशकुमार जे. पाटील यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. उद्घाटनपर समारंभीय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री. सुरेशकुमार जे. पाटील, मुख्य अभियंता यांनी भुषविले. कार्यक्रमास महापारेषणचे श्री. राजेन्द्र तिजारे, अधिक्षक अभियंता, चाचणी व दूरसंचार मंडळ, अकोला, श्री. प्रकाश किनगांवकर, कार्यकारी अभियंता, चाचणी विभाग, यवतमाळ व श्री. शंकर जाधव, कार्यकारी अभियंता, अउदा सं.व सु. विभाग, अकोला उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाला महावितरणचे श्री. डोये, अधिक्षक अभियंता, (इन्फ्रा), अकोला, श्री. शेख, कार्यकारी अभियंता, चाचणी विभाग, अकोला, श्री. दामसे, कार्यकारी अभियंता, शहर विभाग, अकोला व श्री. उंबरकार, कार्यकारी अभियंता, ग्रामिण विभाग, अकोला यांची उपस्थिती लाभली.




नविन सुरू झालेल्या या चाचणी विभागामुळे अकोला, वाशिम आणि बुलढाणा जिल्ह्यातील सर्व चाचणीची कामे अत्यंत कमी वेळात करता येतील आणि महावितरण व महापारेषण मध्ये अधिक समन्वयाने कामे मार्गी लागतील अशी अपेक्षा मुख्य अभियंता मा. सुरेशकुमार जे. पाटील यांनी व्यक्त केली. नविन चाचणी विभागाचा पदभार श्री. राजेन्द्र तिजारे, अधिक्षक अभियंता, चाचणी व दूरसंचार मंडळ, अकोला यांनी श्री. विल्सन डोंगरे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, चाचणी व दूरसंचार मंडळ, अकोला यांना सुपुर्द केला. नविन चाचणी विभागाच्या स्थापनेमुळे सर्व कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरलेआहे.

## कराड परिमंडळ कार्यालयात अउदा संवसु मंडळ कराड अंतर्गत उत्कृष्ठ काम केल्याबद्दल दि. २६ जानेवारी रोजी अधिकारी व कर्मचारी यांचा गुणगौरव





अउदा संवसु मंडल कराड या कार्यालयाच्या अधिकारक्षेत्रातील ४०० केव्ही वाहिनी उपविभाग कराड अंतर्गत ४०० केव्ही कराड ते लोणीकंद या अति उच्च दाबाची एकदल वाहिनीच्या (Single Ckt.) मनोरा क्र.२३६ (ॲंगल कट पॉईंट) या मनो-याचे इन्सुलेटर डिकॅपिंगचे अतिशय अवघड व जोखमीने काम महापारेषण कंपनीच्या कर्मचा-यांमार्फत दिनांक १४/१२/२०१५ ते १६/१२/२०१५ या काळात अतिशय शिस्तबद्ध व काटेकारपणे युद्धपातळीवरती करण्यात आले आहे.

सदरचे अतिशय अवघड व जोखमीचे काम करणेस बाहय कंत्राटदाराने सुद्धा असमर्थता दर्शवली असताना देखील मा.श्री. मस्के, मुख्य अभियंता / श्री. गजभिये, मुख्य अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक अभियंता मा. श्री. पटेल, यांनी पुढाकार घेवून कार्यकारी अभियंता श्री. व्ही. डी. मुळे व श्री. एम.आर.इंगळे, अति. कार्यकारी अभियंता तसेच श्री. ए. ए. पवार, सहा. अभियंता यांच्यासह ४०० केव्ही वाहिनी उपविभागाचे सर्व कर्मचारी, ४०० केव्ही उपकेंद्र देखभाल उपविभाग, चाचणी युनिटचे सर्व कर्मचारी, २२० केव्ही वाहिनी देखभाल उपविभाग ओगलेवाडी व लोणंद येथील सर्व कर्मचाऱ्यांनी सहकार्य करून सदरचे काम वेळेत पूर्ण केले. त्यामुळे महापारेषण कंपनीची कोणतीही वित्तहानी झाली नाही. त्यामुळे संबंधीत सर्व कर्मचाऱ्यांचा प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी दि.२६ जानेवारी २०१६ रोजी मा.श्री.यशवंत गजभिये, मुख्य अभियंता यांच्या हस्ते गुणगौरव प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

सदरहू कामामुळे कोणतेही जोखमीचे काम महापारेषण कंपनीच्या कर्मचाऱ्यामार्फत होवू शकते त्यासाठी योग्य त्या पाठबळाची आवश्यकता आहे असे संबंधीत सर्व कर्मचाऱ्यांनी दाखवून दिले.

# महापारेषणच्या प्रकाशगंगा या मुख्य कार्यालयातील प्रजासत्ताक दिनाची क्षणचित्रे



ध्वजारोहण करतांना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



ध्वजारोहण प्रसंगी मानवंदना देतांना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



ध्वजारोहण प्रसंगी उपस्थित मुख्य कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी वर्ग



ध्वजारोहण प्रसंगी उपस्थित मुख्य कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी वर्ग



ध्वजारोहण प्रसंगी मानवंदना देतांना सुरक्षा रक्षक

# नाशिक येथे आंतरपरिमंडळ क्रीडा स्पर्धांचे आयोजन



महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. मर्या. अति उच्च दाब बांधकाम निं संवसु परिमंडळ नाशिक महापारेषण कार्यालयातर्फे राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रिडास्पर्धा सन २०१५–१६ चे उदघाटन दिनांक १८ जाने. २०१६ रोजी शमिनाताई ठाकरे क्रिडा संकुल हिरावाडी, पंचवटी, नाशिक’’ येथे मा. श्री. सुरज वाघमारे, कार्यकारी संचालक (मासं) यांच्या हस्ते करण्यात आले. दिनांक १८ जानेवारी ते २० जानेवारी २०१६ च्या दरम्यान ह्या स्पर्धा आयोजीत करण्यात आलेल्या होत्या. या क्रिडास्पर्धेच्या बक्षिस वितरण समारंभाचे मुख्य अतिथि म्हणून मा. श्री. ओमप्रकाश एम्पाल, संचालक (संचलन) हे उपस्थित होते.

तसेच श्री. अनंत पाटील, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, श्री ए.के. लाडे मुख्य अभियंता, (मासं) महापारेषण सांघिक कार्यालय मुंबई, श्री जी. टी. मुंढे, मुख्य अभियंता, औरंगाबाद परिमंडळ, श्री. यशवंत गजभिये, मुख्य अभियंता, कराड परिमंडळ, श्री. रोहीदास म्हस्के, मुख्य अभियंता, पुणे परिमंडळ, श्री. पंकज सपाटे, मुख्य अभियंता, महानिर्मिती, नाशिक. तसेच श्री. कांचन अजनाळकर, मुख्य अभियंता, महावितरण, नाशिक परिमंडळ, श्री. सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मासं), श्री. जे. जी. चुडे, अधीक्षक अभियंता, श्री. एस.पी. वसेकर, श्री. सतिश गायकवाड, श्री. संजय अत्राम, श्री. किशोर जाधव व श्री. भरत पाटील, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, व श्री प्रविण पाटील, सहा. क्रिडा सहाय्यक सांघिक कार्यालय मुंबई हे आवर्जुन उपस्थित होते.




या क्रिडास्पर्धेस महाराष्ट्रातून महापारेषण कंपनीतील सर्व परिमंडळातून अंदाजे १००० खेळाडू सहभागी झालेले होते. सांघिक विजेतेपद या वर्षी औरंगाबाद व कराड परिमंडळास संयुक्तीकरित्या मिळाले. वैयक्तिक व सांघिक १० ही खेळातील विजेत्यांना मा. श्री. एम्पाल साहेब व श्री वाघमारे साहेब यांच्या हस्ते पदक व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.

मुख्य अभियंता, श्री बी.टी. राऊत यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले तसेच, या क्रिडास्पर्धा सर्वांनी एकजुटीने सांघिक भावनेने व आपल्या कंपनीचे नावलौकिक वाढविण्याच्या दृष्टीने अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात खेळाडूंनी पार पाडल्याबाबत सर्वानाशुभेच्छादिल्या.

वरील कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. एस. एस. नवलाखे, कार्यकारी अभियंता, (प्रशासन), श्री. एस.एस. पवार, श्री. विनोद ढोरे, श्री सुनिल तीरमारे, श्री. पी. पी. भालेराव, कार्यकारी अभियंता श्री. राहूल सुतार, सहा. महाव्यवस्थापक (मासं) व श्री. मिलींद घोलप, सहा. महाव्यवस्थापक (विवले), यांनी केले व यशस्वीरित्या कार्यक्रम संपन्न केलाआहे.

उर्वरित पान ६ वर

# विद्युत सुरक्षा सप्ताह व प्रशिक्षण





ग्रामीण पॉलिटेक्नीक कॉलेज, विष्णुपूरी, नांदेड यांनी महाराष्ट्रातील विविध पॉलिटेक्नीक कॉलेज मधील इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग विभागांतर्गत प्राध्यापकांसाठी दि. १५.०१.२०१६ रोजी १३२ के. व्ही. इलिचपूर उपकेंद्र येथे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. सदरील प्रशिक्षणामध्ये कार्यकारी अभियंता, श्री. डी एस शेंदूरवादकर यांनी उपकेंद्रा बाबत माहिती देवून उपकेंद्रांचे महत्व, उपकेंद्रांची कार्यप्रणाली, उपकेंद्रातील नवनवीन तंत्रज्ञान, उपकेंद्रातील सुरक्षा व्यवस्था, दैनंदीन जिवनातील वीज विषयक सुरक्षा याबाबत मार्गदर्शन केले, तसेच सोलार एनर्जी निर्मीती व वापरा बाबत प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांमधे व जनते मधे जागृती निर्माण करावी असे मत व्यक्त केल.

विद्युत सुरक्षा सप्ताहाचे औचित्य साधून श्री. बनसोडे , कार्यकारी अभियंता, यांनी प्रशिक्षणार्थी प्राध्यापकांना वीज उपक्रमे हाताळतांना व वीज संच मांडणीवर काम करतांना घ्यावयाच्या सुरक्षा काळजी बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. सर्व प्राध्यापकांनी प्रशिक्षणा दरम्यान मिळालेल्या मोलाच्या माहिती बाबत समाधान व्यक्त केले. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी श्री. इप्ते, उपकार्यकारी अभियंता व उपकेंद्रावरील अधिकारी व कर्मचारी याबरोबरच पॉलिटेक्नीक कॉलेज, विष्णुपूरी येथील इलेक्ट्रिक इंजिनिअरींग विभाग प्रमुख व प्राध्यापक यांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यास मोलाचे योगदान देवून सहकार्य केले.

पान ५ पासून...

# सांघीक स्पर्धेतील विजेते व उपविजेती परिमंडळे

| अ.क्र. | खेळाचा प्रकार | विजेता परिमंडळ, | उपविजेता परिमंडळ |
|---|---|---|---|
| १ | क्रिकेट | पुणे परिमंडळ | वाशी परिमंडळ |
| २ | हॉलीबॉल | वाशी परिमंडळ | औरंगाबाद परिमंडळ |
| ३ | कबड्डी | कराड परिमंडळ | औरंगाबाद परिमंडळ |
| ४ | बॅडमिंग्टन महिला | औरंगाबाद परिमंडळ | वाशी परिमंडळ |
| ५ | बॅडमिंग्टन पुरुष | कराड परिमंडळ | वाशी परिमंडळ |
| ६ | टेबल टेनिस | नाशिक परिमंडळ | औरंगाबाद परिमंडळ |
| ७ | ब्रिज | कराड परिमंडळ | पुणे परिमंडळ |
| ८ | कॅरम | वाशी परिमंडळ | कराड परिमंडळ |
| ९ | कॅरम पुरुष | औरंगाबाद परिमंडळ | कराड परिमंडळ |
| १० | गोळाफेक महिला | कराड परिमंडळ | औरंगाबाद परिमंडळ |

# बक्षीस पात्र उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांचे कौतुक

२०१३-२०१४ वर्षाकरीता झालेल्या उत्कृष्ट उपकेंद्र स्पर्धेमध्ये अउदा संवसु विभाग नांदेड मधील १३२ केव्ही अर्धापूर उपकेंद्राने परिमंडळ पातळीवर द्वितीय क्रमांक पटकावलेला आहे. या कामगिरीसाठी १३२ केव्ही अर्धापूर उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांचे कौतुक



करण्यासाठी मा. श्री. गणपतरावजी मुंडे, मुख्य अभियंता, औरंगाबाद परिमंडळ यांनी १३२ केव्ही अर्धापूर उपकेंद्रास भेट दिली.

श्री. गणपतरावजी मुंडे, मुख्य अभियंता यांच्या हस्ते उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांना प्रमाण पत्राचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी मार्गदर्शन करतांना श्री. मुंडे साहेब यांनी कर्मचाऱ्यांनी येथेच न थांबता राज्य पातळीवर क्रमांक आणण्यासाठी प्रयत्नशील रहावे.तसेच या कर्मचाऱ्यांनी नांदेड विभागातील इतर उपकेंद्रामध्ये जाऊन तेथील कर्मचाऱ्यांना त्यांच्या उपकेंद्राना आपल्या प्रमाणेच कार्य करण्यास प्रोत्साहीत करावे. असे मार्गदर्शन केले. उपकेंद्र देखभाली बाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.




या प्रसंगी अधीक्षक अभियंता, श्री. वाघमारे, कार्यकारी अभियंता, श्री. पाटील हे उपस्थित होते. उपकेंद्र बक्षीस पात्र होणेसाठी केलेल्या कामाबाबत श्री. हानिफ, अति. कार्यकारी अभियंता यांनी निवेदन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. शेंदुरवादक, कार्यकारी अभियंता, श्री. ए.ए. खान, अति. कार्यकारी अभियंता, श्री. राठोड, अति. कार्यकारी अभियंता, उपकेंद्र प्रमुख श्री. पी. एस. मस्के व उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**INDIAN INSTITUTE OF MANAGEMENT KOZHIKODE**
**Management Development Programme**
**on**
**Enhancing Organizational and Individual Performance through Performance Management System**
**December 07-09, 2015**



First Row : Kavindra Pant, Ashish Suresh Baisware, Chunarkar Sadanand B., Prof. T N Krishnan, Dr. Prasanth Nair, Manjusha Dusane, Sonali Ganesh Barapatre, Sukhada Marotrao Sontakke, Bhong Karishma S., Snigdha K T

Second Row : Patil Vidyadhar Hasu, Neharkar Sunil N., Katkar Sunil Tukaram, Patil Kuldeepsing D., Mali Vishal P., Borkar Pankaj P., Shastri Amol S. Kumbhare Rajesh S. Deshmukh Shriram L., Pange Pushparaj M

**महापारेषणचे अधिकारी वर्ग IIMs मधून प्रशिक्षीत होत आहेत, त्यातील IIM Kozhikode चे छायाचित्र**

# FROM THE DESK OF ED (HR)

## IQ/EQ - यशाचे घटक

Intelligent & Emotional Quotient हा व्यक्तीनुरूप वेगवेगळा असतो. बुध्यांकाचा संबंध फक्त शिक्षणाबरोबर असतो असे नाही तर तो व्यक्ती बौध्दीक दृष्ट्या सक्षम आहे, त्याची बुध्दी कुठे कमी पडत नाही मग तो कोणत्याही क्षेत्रात काम करणारा असो.

भावनिकतेचा संबंध व्यक्तीच्या दुसऱ्या व्यक्तीबरोबर किंवा गट / समुदाय यांच्या बरोबर जोडण्याच्या क्षमतेवर असते. जगामध्ये यशस्वी असलेल्या व्यक्तीमध्ये त्याचा EQ उच्च पातळीवर असलेला दिसून येतो. ह्या घटकाचा खोलात अभ्यास केला असता असे दिसून येते की IQ एका पातळीपर्यंत उपर्युक्त ठरतो, मात्र विशेष कामगिरी करीता EQ उच्च पातळीवर असलेली व्यक्ती पुढे गेलेली दिसते. चांगला EQ असल्याकारणास्तव त्याचा सकारात्मक परिणाम IQ सुधारणे करीता होतो.

EQ ची उणीव किंवा कमतरता असणे काळजीचे ठरते. अशा व्यक्तीमध्ये एकाकीपणा, हेकेखोर वृत्ती व टोकाची भूमिका असलेली वृत्तीचा प्रार्दुभाव आढळतो. त्याचबरोबर IQ ची उणीव किंवा कमतरता व्यक्तीस त्याच्या कार्यक्षेत्रास लागणाऱ्या तांत्रिक बाबीमध्ये मागे पडलेले आपण पाहतो. मात्र जर त्यांचा IQबरोबरच्या पातळीवर असेल तर त्यामुळे त्यांच्या बाह्य घटकांना काही धोका होत नाही. EQ उच्चपातळीवर व IQ बरोबरच्या पातळीवर असणारे फार मोठी क्षमता बाळगतात व विशेष कामगिरी त्यांच्याकडून घडू शकते. त्याबरोबर IQउच्चपातळीवर व EQ बरोबरच्या पातळीवर असणारे त्यांच्या तांत्रिक कार्यक्षेत्रात चांगली कामगिरी करण्याची क्षमता ठेवतात. IQ व EQ दोन्ही उच्च पातळीवर असणारे असाधारण व्यक्तीमत्व ठरते ते दिशाबदलण्याची तसेच घडी बदलण्याची क्षमता ठेवतात अतिशय व्यापक व मोठ्या कामगिरीची अपेक्षा त्यांच्याकडून आपण करू शकतो. करीता EQ चे अनन्य साधारण महत्व लक्षात घेता तो विकसीत करण्याचा जाणीवपुर्वक प्रयत्न करणे गरजेचे ठरते.

आजच्या यांत्रिक व आधुनिक युगात IQ विकसीत होतो व EQ मागे पडत असताना आपण पाहतो. क्रिडा, कला, समाजकार्य तसेच सार्वजनिक कार्यात EQ विकासाकरीता पोषक वातावरण तयार होते. पुस्तकी कीडा होण्यापेक्षा सर्वांगीण विकासावर लक्ष ठेवणे महत्वाचे आहे. संभाषण तसेच स्पर्धा (चित्रकला, भाषण, हस्तकला) यामुळे EQ वाढीस प्रेरणा मिळू शकते. स्वत:ची कामे स्वत: करणे, स्वालंबन, परिस्थितीची जाणीव राहणे, सहभाग, सहकार्य अशा प्रकारच्या घटकांमुळे EQ विकासाकरीता पोषक वातावरण निर्माण होवू शकते. फक्त IQ असणे व्यक्तीस फार एकाकी बनवते त्याउलट EQ समतोल साधतात. आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता त्यांच्यामध्ये निर्माण होते. सोप्या शब्दात सांगायचे झाले तर IQ आपल्याला कुशल व्यवस्थापक बनवू शकतो मात्र EQ आपल्याला कुशल नेता बनवण्याची क्षमता आपल्यामध्ये निर्माण करतो.

शुभेच्छा सह!

**From the Desk of ED (HR)**

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती माहे डिसेंबर-जानेवारी २०१५-१६

### नियुक्ती

| अ. क्र. | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. गजभिये यशवंत जी. | मुख्य अभियंता | कराड परिमंडळ | ०७.१२.२०१५ |
| २ | श्री. ढेंगळे एकनाथ ठकसेन | अधीक्षक अभियंता | राज्य भार प्रेषण केंद्र, कळवा | ३०.१२.२०१५ |
| ३ | श्री. शिंदे अविनाश विष्णुपंत | अधीक्षक अभियंता | कराड परिमंडळ | ३०.१२.२०१५ |
| ४ | श्री. जांगडे मोरेश्वर सदाशिव | अधीक्षक अभियंता | वाशी परिमंडळ | ३०.१२.२०१५ |

### निवृत्ती

| अ. क्र. | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. चिंचवडकर शिरीष महादेव | अधीक्षक अभियंता (पारेषण) | कराड परिमंडळ | ३१.१२.२०१५ |

संपादक : श्री.संदीप नरडेले, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. सी. - १९, ई. ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO
Printed at Hema Arts : 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra Kurla Complex, Mumbai - 400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.